**पंतप्रधानांची कुवेत स्थित लेबर कॅम्पला भेट**

21 डिसेंबर 2024

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आपल्या कुवेत भेटी प्रसंगी कुवेतच्या मिना अब्दुल्ला भागात स्थित लेबर कॅम्पला भेट दिली. या लेबर कॅम्पमध्ये जवळपास 1500 भारतीय कामगार उपस्थित होते. पंतप्रधानांनी भारताच्या विविध राज्यातील कामगार प्रतिनिधींशी प्रातिनिधिक संवाद साधला आणि त्यांच्या स्वास्थ्याविषयी चौकशी केली.

2. परदेशात कार्यरत भारतीय कामगारांप्रति आपला स्नेहभाव व्यक्त करण्याच्या हेतूने पंतप्रधानांनी लेबर कॅम्पला दिलेल्या भेटीला प्रतिकात्मक महत्व आहे. मागील काही वर्षात सरकारने परदेशातील भारतीय कामगारांच्या कल्याणासाठी विविध तंत्रज्ञान-आधारित उपक्रम हाती घेतले आहेत. ज्यामध्ये ई-मायग्रेट पोर्टल, MADAD पोर्टल आणि सुधारित प्रवासी भारतीय विमा योजना यांचा समावेश आहे.

कुवेत सिटी

21 डिसेंबर 2024